# NMMC 93 (CBSE) School Monthly Report
# November 2025

## ACADEMIC ACHIEVEMENT

### 1. Parent Teacher Student Meeting

Following the Mid-Year results, the Parent–Teacher–Student Meeting (PTSM) was conducted in two well-planned phases to facilitate focused discussions on student performance and progress towards goals set earlier in the year. For Nursery to Grade 2, the PTSM was held on 7th November, during which teachers engaged parents in individual conversations to review Mid-Year outcomes, learning milestones, and specific support strategies. For Grades 3 to 8, the PTSM took place on 15th November with pre-assigned time slots, ensuring organised and meaningful interactions. This structure enabled in-depth reflection on academic performance, behavioural development, and goal alignment, while strengthening collaboration between parents, students, and teachers for continued growth in the next term.

मिड-ईयर परीक्षांच्या निकालानंतर पालक–शिक्षक–विद्यार्थी बैठक (PTSM) दोन टप्प्यांमध्ये राबविण्यात आली, ज्यामुळे विद्यार्थ्यांच्या कामगिरीवर आणि वर्षाच्या सुरुवातीला ठरवलेल्या उद्दिष्टांवरील प्रगतीवर सखोल चर्चा करता आली. नर्सरी ते इयत्ता २ साठी ही बैठक ७ नोव्हेंबर रोजी घेण्यात आली. या दरम्यान शिक्षकांनी प्रत्येक विद्यार्थ्याच्या मिड-ईयर निकालांवर, शिकण्यातील प्रगतीवर आणि आवश्यक सहाय्य योजनांवर पालकांशी वैयक्तिक संवाद साधला.

इयत्ता ३ ते ८ साठी PTSM १५ नोव्हेंबर रोजी नियोजित वेळापत्रकानुसार घेण्यात आली, ज्यामुळे बैठक शिस्तबद्ध व परिणामकारक ठरली. या रचनेमुळे शैक्षणिक कामगिरी, वर्तनात्मक विकास आणि ठरवलेल्या उद्दिष्टांचा आढावा घेणे शक्य झाले. या बैठकीमुळे पालक, विद्यार्थी आणि शिक्षक यांच्यातील सहकार्य अधिक दृढ झाले आणि पुढील सत्रासाठी स्पष्ट दिशा ठरविण्यात मदत झाली.

### 2. Performance Task Term 2 Gr 1 to 8

The Performance Task for KG to Grade 8 (Unit 5) was conducted in November during regular school hours to promote activity-based learning and strengthen conceptual understanding across subjects. For Grades 1 to 8, the task was implemented over five days, beginning with an introductory discussion followed by group-based preparation and presentations. Subject-wise scheduling included English and Social Studies (10–15 November), Hindi and Science (17–22 November), and Mathematics and Marathi (24–27 November). Students demonstrated their learning through creative formats such as PPTs, skits, documentaries, and working models, encouraging collaboration and active participation.

For KG, the performance tasks were conducted over two days per subject through hands-on activities in Phonics, Numeracy, and Thematic areas, with assessment based on defined rubrics. Overall, the activity enhanced students' engagement, communication, teamwork, and critical thinking skills while allowing teachers to assess learning beyond written evaluations. Going forward, the school plans to continue performance-based assessments and create more opportunities for students to showcase their work, supporting deeper and more integrated learning.

**KG ते इयत्ता 8 (युनिट 5) साठीचे परफॉर्मन्स टास्क** नोव्हेंबर महिन्यात नियमित शालेय वेळेत राबविण्यात आले, ज्याचा उद्देश कृतीआधारित अध्यापनाला प्रोत्साहन देणे आणि विविध विषयांतील संकल्पनात्मक समज दृढ करणे हा होता. **इयत्ता 1 ते 8** साठी हा उपक्रम पाच दिवसांचा होता. पहिल्या दिवशी प्रस्तावना व चर्चा करण्यात आली, त्यानंतर गटांमध्ये तयारी व सादरीकरण करण्यात आले. विषयानुसार वेळापत्रक असे होते— **इंग्रजी व सामाजिक शास्त्र (10–15 नोव्हेंबर), हिंदी व विज्ञान (17–22 नोव्हेंबर), तसेच गणित व मराठी (24–27 नोव्हेंबर)**. विद्यार्थ्यांनी **PPT, नाट्यप्रयोग, माहितीपट आणि कार्यकारी मॉडेल्स** यांच्या माध्यमातून आपले शिक्षण सादर केले, ज्यामुळे सहकार्य आणि सक्रिय सहभाग वाढला.

**KG वर्गासाठी**, फॉनिक्स, संख्याज्ञान (Numeracy) आणि थीमॅटिक विषयांमध्ये प्रत्येकी दोन दिवसांचे कृतीआधारित परफॉर्मन्स टास्क घेण्यात आले आणि ठरवलेल्या मूल्यमापन निकषांनुसार मूल्यांकन करण्यात आले. एकूणच, या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांचा सहभाग, संवादकौशल्ये, संघकार्य आणि विचारक्षमतेत वाढ झाली, तसेच शिक्षकांना लेखी मूल्यमापनाच्या पलीकडे जाऊन विद्यार्थ्यांचे शिक्षण समजून घेण्याची संधी मिळाली. पुढील काळात अशा परफॉर्मन्स-आधारित मूल्यमापन उपक्रमांचा सातत्याने वापर करून विद्यार्थ्यांना आपले काम सादर करण्यासाठी अधिक संधी देण्याचा शाळेचा मानस आहे, ज्यामुळे अधिक सखोल व एकात्मिक शिक्षण साध्य होईल.

### 3. Data Analysis MOY Assessments

To build a clear, data-driven understanding of student performance across grades and subjects, the school conducted ongoing meetings throughout November to analyse Mid-Year Assessment data and overall student outcomes. Each Akanksha Subject Instructional Specialist, School Coach, and member of the School Leadership Team carried out a detailed, subject-wise analysis across all grades. This process included reviewing performance patterns across classes and subjects, analysing sample answer scripts from students across different score ranges, and evaluating the quality of corrections and the rigor of the question papers. Common error trends and misconceptions were examined closely, along with correction patterns to better understand student thinking. These insights informed in-depth discussions with teachers, enabling the identification of root causes and the strengthening of instructional practices through targeted support, focused interventions, and improved conceptual mastery for all students.

विद्यार्थ्यांच्या कामगिरीबाबत इयत्तानिहाय आणि विषयानिहाय स्पष्ट व डेटा-आधारित समज विकसित करण्यासाठी शाळेमार्फत नोव्हेंबर महिन्यात सातत्याने बैठका घेण्यात आल्या. मिड-ईयर मूल्यांकनाचे डेटा

आणि विद्यार्थ्यांचे एकूण निकाल यांचे सखोल विश्लेषण करण्यात आले. प्रत्येक आकांक्षा विषय अध्यापन तज्ज्ञ, शाळा प्रशिक्षक आणि शाळा नेतृत्व संघातील सदस्यांनी सर्व इयत्तांमध्ये विषयनिहाय सविस्तर विश्लेषण केले.

या प्रक्रियेमध्ये वर्ग व विषयांनुसार कामगिरीचे नमुने पाहणे, विविध गुणश्रेणीतील विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिकांचे विश्लेषण करणे, दुरुस्तीची गुणवत्ता आणि प्रश्नपत्रिकेची कठोरता तपासणे यांचा समावेश होता. विद्यार्थ्यांच्या विचारप्रक्रिया अधिक चांगल्या प्रकारे समजून घेण्यासाठी सामान्य चुका आणि गैरसमज तसेच दुरुस्तीच्या पद्धतींचा बारकाईने अभ्यास करण्यात आला. या निरीक्षणांमुळे शिक्षकांसोबत सखोल चर्चा घडून आल्या, ज्यातून मूळ कारणांची ओळख पटली आणि लक्ष केंद्रीत सहाय्य, परिणामकारक हस्तक्षेप आणि सर्व विद्यार्थ्यांसाठी संकल्पनात्मक समज दृढ करण्यासाठी अध्यापन पद्धती अधिक सक्षम करण्यात आल्या.

## 4. LEAD Cluster Meeting at Pune



The LEAD Cluster Lab visit, conducted by the LEAD Team on 29th November 2025 at Kunjir Public School, Pune, was organized for the schools supported under the LEAD program. The session aimed to strengthen teachers' instructional practices through LEAD's structured, student-centric approach and to enhance their effective use of lesson plans and digital tools for improved classroom learning. The training focused on guiding teachers in delivering the LEAD curriculum through well-planned lessons, activity-based teaching methods, and increased student engagement. Emphasis was placed on refining instructional strategies, improving classroom practices, and ensuring better learning outcomes. The program was conducted in cluster groups, including Academic Coordinators, ELGA, and Mathematics teachers, covering Grades 1 to 7. As a result of the training, teachers gained greater confidence in implementing structured lesson plans and integrating digital tools into their teaching. They became better equipped to deliver engaging, activity-oriented lessons that support effective classroom learning and contribute to improved student outcomes.

LEAD कार्यक्रमाअंतर्गत समर्थित शाळांसाठी **29 नोव्हेंबर 2025** रोजी **कुंजिर पब्लिक स्कूल, पुणे** येथे LEAD टीमद्वारे **LEAD क्लस्टर लॅब भेट** आयोजित करण्यात आली. या सत्राचा उद्देश LEAD च्या संरचित आणि विद्यार्थी-केंद्रित पद्धतीद्वारे शिक्षकांच्या अध्यापन पद्धती अधिक सक्षम करणे तसेच अध्यापन अधिक प्रभावी होण्यासाठी धडे आराखडे आणि डिजिटल साधनांचा योग्य वापर करण्याची क्षमता वाढवणे हा होता.

या प्रशिक्षणात शिक्षकांना नियोजित धडे, कृतीआधारित अध्यापन पद्धती आणि विद्यार्थ्यांचा सहभाग वाढवून LEAD अभ्यासक्रम प्रभावीपणे राबवण्याचे मार्गदर्शन करण्यात आले. अध्यापन धोरणांमध्ये सुधारणा करणे, वर्गातील अध्यापन पद्धती अधिक प्रभावी बनवणे आणि विद्यार्थ्यांच्या शिक्षण परिणामांमध्ये सुधारणा घडवून आणणे यावर विशेष भर देण्यात आला. हे प्रशिक्षण **शैक्षणिक समन्वयक, ELGA आणि गणित विषयाचे शिक्षक** अशा क्लस्टर गटांमध्ये घेण्यात आले असून **इयत्ता 1 ते 7** पर्यंतच्या शिक्षकांचा समावेश होता.

या प्रशिक्षणामुळे शिक्षकांना संरचित धडे आराखडे आणि डिजिटल साधने वापरण्यात अधिक आत्मविश्वास प्राप्त झाला. त्यांनी कृतीआधारित, आकर्षक अध्यापन पद्धती अवलंबून प्रभावी वर्ग-अध्यापन करण्याची क्षमता विकसित केली, ज्यामुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षण प्रक्रियेला आणि शैक्षणिक परिणामांना सकारात्मक हातभार लागला.

## STUDENT VOICE AND WELL-BEING

5. SEE Staff PD

The Day 1 SEE (Social, Emotional and Ethical Learning) session was conducted in two batches this month—one for returning teachers and one for new teachers—with the aim of introducing SEE Learning, its purpose, and its role in supporting students' emotional wellbeing. Teachers were oriented to key components such as attention training, self-awareness, compassion, and resilience, and participated in reflection activities that helped them notice how SEE skills show up in their personal and professional lives, including at home, with colleagues, and during stressful situations. Overall, the session emphasized that SEE Learning naturally supports everyday teaching and positive classroom culture. Teachers reported gaining a clearer understanding of SEE and shared increased awareness of their own emotional triggers and the importance of pausing before reacting. The next steps include supporting classroom implementation through follow-ups, and holding monthly SEE cluster meetings to share challenges and successes.



या महिन्यात SEE (Social, Emotional and Ethical Learning) चा पहिल्या दिवसाचा सत्र दोन टप्प्यांमध्ये घेण्यात आला—एक परत येणाऱ्या शिक्षकांसाठी आणि दुसरा नवीन शिक्षकांसाठी. या सत्राचा उद्देश SEE Learning, त्याचा हेतू आणि विद्यार्थ्यांच्या भावनिक कल्याणासाठी त्याचे महत्त्व समजावून सांगणे हा होता. शिक्षकांना लक्ष प्रशिक्षण, आत्म-जाणीव, करुणा आणि लवचिकता यांसारख्या प्रमुख घटकांची ओळख करून देण्यात आली. तसेच चिंतनात्मक

उपक्रमांद्वारे SEE कौशल्ये त्यांच्या वैयक्तिक व व्यावसायिक आयुष्यात—घरात, सहकाऱ्यांसोबत किंवा तणावपूर्ण परिस्थितीत—कशी दिसून येतात याचा विचार करण्याची संधी देण्यात आली. एकूणच, SEE Learning दैनंदिन अध्यापन आणि सकारात्मक वर्गसंस्कृतीला नैसर्गिकरित्या कसे समर्थन देते यावर सत्रात भर देण्यात आला. शिक्षकांनी SEE बद्दल अधिक स्पष्ट समज मिळाल्याचे सांगितले तसेच स्वतःच्या भावनिक प्रतिक्रिया ओळखणे आणि प्रतिक्रिया देण्यापूर्वी थांबण्याची गरज याची जाणीव वाढल्याचेही त्यांनी शेअर केले. पुढील टप्प्यात वर्गात SEE च्या अंमलबजावणीसाठी फॉलो-अपद्वारे समर्थन देणे आणि अडचणी व यशकथा शेअर करण्यासाठी मासिक SEE क्लस्टर बैठकांचे आयोजन करण्यात येईल.

## 6. Children's Day Field Trips Nur to Grade 8

In November, a series of thoughtfully planned field trips were organised across grade levels to celebrate **Children's Day** and to provide students with enriching learning experiences beyond the classroom. These trips combined joy, exploration, and purposeful learning while ensuring safety and age-appropriate engagement.

On 12th and 13th November, Pre-Primary children visited *Jumping Frog*, where they enthusiastically explored a vibrant play zone with trampolines, slides, soft-play areas, and obstacle courses. Teachers and helper didis closely supervised the children, ensuring safety while encouraging movement, coordination, and social interaction. The experience was filled with laughter, excitement, and joyful memories.

On 14th November, marking Children's Day, students from Grades 1, 2, and 3 visited *Cinepolis Theatre* to watch *Paddington in Peru*. Prior to departure, teachers briefed students on safety guidelines and appropriate public behaviour. At the theatre, children were seated in an orderly manner and supervised throughout. The warm, humorous, and family-friendly film kept students engaged while reinforcing values of kindness and empathy.




Older students explored learning through real-world contexts. A visit to the *Nehru Science Centre on* 13th Nov 2025, offered hands-on experiences with interactive exhibits on energy, space, the human body, and simple machines. Outdoor science installations and the Science Odyssey and 3D shows enhanced conceptual understanding and teamwork.

Students of Grades 6, 7, and 8 visited the *Chhatrapati Shivaji Maharaj Vastu Sangrahalaya* on 12th Nov 2025, where they studied artifacts, recorded observations, and participated in a Stone Age weapons seminar. These experiences supported curriculum connections and critical thinking. Overall, the Children's Day field trips created meaningful, joyful, and memorable learning experiences for all students.

नोव्हेंबर महिन्यात बालदिनाच्या निमित्ताने सर्व इयत्तांसाठी विचारपूर्वक नियोजित अशा शैक्षणिक सहली आयोजित करण्यात आल्या, ज्यांचा उद्देश वर्गाबाहेरील समृद्ध आणि आनंददायी शिकण्याचा अनुभव विद्यार्थ्यांना देणे हा होता. या सहलींमध्ये आनंद, शोध आणि उद्देशपूर्ण शिक्षण यांचा समतोल राखण्यात आला, तसेच विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेची आणि वयोगटानुसार सहभागाची विशेष काळजी घेण्यात आली.

१२ व १३ नोव्हेंबर रोजी पूर्व-प्राथमिक वर्गातील विद्यार्थ्यांनी *जंपिंग फ्रॉग* येथे भेट दिली. येथे ट्रॅम्पोलिन्स, स्लाईड्स, सॉफ्ट-प्ले क्षेत्रे आणि अडथळा मार्गिका अशा रंगीबेरंगी खेळ क्षेत्रांचा त्यांनी उत्साहाने आनंद घेतला. शिक्षक व हेल्पर दीदींनी विद्यार्थ्यांवर सतत देखरेख ठेवली, सुरक्षितता सुनिश्चित करत हालचाल, समन्वय आणि सामाजिक संवादाला प्रोत्साहन दिले. हा अनुभव हास्य, उत्साह आणि आनंददायी आठवणींनी परिपूर्ण होता.

१४ नोव्हेंबर रोजी, बालदिनाचे औचित्य साधून इयत्ता १, २ आणि ३ मधील विद्यार्थ्यांनी *सिनेपोलिस थिएटर* येथे *Paddington in Peru* हा चित्रपट पाहिला. सहलीपूर्वी शिक्षकांनी विद्यार्थ्यांना सुरक्षिततेचे नियम व सार्वजनिक ठिकाणी योग्य वर्तन याबाबत मार्गदर्शन केले. थिएटरमध्ये विद्यार्थ्यांना शिस्तबद्ध पद्धतीने बसविण्यात आले व संपूर्ण वेळ देखरेख करण्यात आली. प्रेमळ, विनोदी आणि कुटुंबासाठी योग्य असलेल्या या चित्रपटाने विद्यार्थ्यांचे मनोरंजन करताना दयाळूपणा व सहानुभूती यांसारख्या मूल्यांना अधोरेखित केले.



मोठ्या वर्गातील विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष अनुभवातून शिकण्याचा आनंद घेतला. १३ नोव्हेंबर २०२५ रोजी *नेहरू विज्ञान केंद्र* येथे दिलेल्या भेटीत ऊर्जा, अवकाश, मानवी शरीर आणि साधी यंत्रे यांवरील परस्परसंवादी प्रदर्शनांचा त्यांनी अनुभव घेतला. बाह्य विज्ञान उपकरणे तसेच *सायन्स ओडिसी* आणि 3D शोमुळे संकल्पनात्मक समज आणि संघभावना अधिक दृढ झाली.

इयत्ता ६, ७ आणि ८ मधील विद्यार्थ्यांनी १२ नोव्हेंबर २०२५ रोजी *छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय* येथे भेट दिली. येथे त्यांनी विविध कलाकृतींचा अभ्यास केला, निरीक्षणे नोंदवली आणि दगडी युगातील शस्त्रांवरील कार्यशाळेत सहभाग घेतला. या अनुभवांनी अभ्यासक्रमाशी संबंध जोडण्यास आणि चिकित्सक विचारशक्ती विकसित करण्यास मदत केली.

एकूणच, बालदिनाच्या निमित्ताने आयोजित या शैक्षणिक सहली सर्व विद्यार्थ्यांसाठी अर्थपूर्ण, आनंददायी आणि संस्मरणीय ठरल्या.

## 7. NMMC Science Quiz

A team of three students—Shlok Mhatre (Grade 6), Chaitra Gayam (Grade 7), and Sumedh Ramtaker (Grade 8)—represented the school at the NMMC Science Quiz conducted on 17th November at the NMMC Amphitheatre. The competition, which commenced at 9:30 a.m., saw participation from 28 NMMC schools. Demonstrating strong scientific knowledge, quick recall, and effective teamwork across multiple rounds, the team performed with confidence and consistency. Their commendable effort earned them a well-deserved third place, making the school proud.

इयत्ता ६ मधील श्लोक म्हात्रे, इयत्ता ७ मधील चैत्रा गायम आणि इयत्ता ८ मधील सुमेध रामटाकर अशा तीन विद्यार्थ्यांच्या संघाने १७ नोव्हेंबर रोजी NMMC ॲम्फीथिएटर येथे आयोजित NMMC विज्ञान प्रश्नमंजुषेत शाळेचे प्रतिनिधित्व केले. सकाळी ९:३० वाजता सुरू झालेल्या या स्पर्धेत NMMC अंतर्गत २८ शाळांमधील

विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. अनेक फेऱ्यांमध्ये विद्यार्थ्यांनी आपले सशक्त वैज्ञानिक ज्ञान, जलद स्मरणशक्ती आणि प्रभावी संघकार्य दाखवत आत्मविश्वासाने आणि सातत्याने उत्कृष्ट कामगिरी केली. त्यांच्या प्रशंसनीय प्रयत्नांमुळे संघाने मानाचा तिसरा क्रमांक पटकावला आणि शाळेचा गौरव वाढविला.

## 8. SL Exposure Visit for SEWA at Dongri Children' s Home

As part of a collaborative initiative, School Leaders and Assistant School Leaders from Akanksha schools across Mumbai and Navi Mumbai visited the Dongri Children's Home on 11th November. The visit enabled leaders to engage directly with the children who stayed at the juvenile home, build meaningful connections, and gain firsthand understanding of their lived experiences and needs. Following the visit, a reflective debriefing session was held at Mahalaxmi Mumbai Public School, where leaders shared insights, discussed educational challenges faced by the children, and collaboratively explored sustainable and impactful strategies to support their learning journeys and long-term well-being of all children we cater to at schools so that at risk students are identified.




सहकार्यात्मक उपक्रमाचा एक भाग म्हणून मुंबई आणि नवी मुंबईतील आकांक्षा शाळांमधील शाळा प्रमुख व सहाय्यक शाळा प्रमुखांनी ११ नोव्हेंबर रोजी डोंगरी बालगृहाला भेट दिली. या भेटीमुळे नेतृत्व संघाला बालसुधारगृहात राहणाऱ्या मुलांशी थेट संवाद साधता आला, त्यांच्याशी अर्थपूर्ण नाती निर्माण करता आली आणि त्यांच्या जीवनानुभवांबाबत व गरजांबाबत प्रत्यक्ष समज प्राप्त झाली.

या भेटीनंतर महालक्ष्मी मुंबई पब्लिक स्कूल येथे चिंतनशील आढावा बैठक घेण्यात आली. या बैठकीत नेत्यांनी आपले निरीक्षणे आणि अनुभव शेअर केले, मुलांना भेडसावणाऱ्या शैक्षणिक आव्हानांवर चर्चा केली आणि शाळांमधील सर्व विद्यार्थ्यांच्या, विशेषतः जोखमीतील विद्यार्थ्यांची ओळख पटवून, त्यांच्या शिकण्याच्या प्रवासासाठी आणि दीर्घकालीन कल्याणासाठी शाश्वत व परिणामकारक उपाययोजना एकत्रितपणे शोधल्या.

## PARENT COMMUNITY ENGAGEMENT AND DEVELOPMENT

9. Akanksha Community Day

The Community Day was conducted on **5th November 2025**, bringing together staff members from all Mumbai schools along with central team members. The objective of the day was to foster creativity, well-being, and continuous learning among teachers through thoughtfully curated experiential sessions.

Community Day was specially designed to provide teachers with a platform to come together, learn, and unwind through a range of enriching experiences. The programme offered a vibrant mix of workshops and activities, creating opportunities for both professional development and personal expression.

Teachers had the option to enrol in any three activities from a curated list that included **Mandala Art, Film Screening, Instagram Video Creation, Woodwork, Theatre, and Financial Literacy**. Each session was facilitated by experienced experts and practitioners from various organisations, ensuring meaningful engagement and high-quality learning experiences.

The atmosphere throughout the day was lively and collaborative. Participants explored new skills, connected with colleagues from different schools, and enjoyed a refreshing break from their daily routines. The facilitators introduced diverse perspectives and creative approaches, making each session insightful and enjoyable.

Overall, Community Day successfully celebrated the spirit of togetherness, creativity, and continuous learning, leaving teachers inspired, energised, and equipped with fresh ideas to take back to their classrooms.

कम्युनिटी डे हा ५ नोव्हेंबर २०२५ रोजी आयोजित करण्यात आला होता. या उपक्रमात मुंबईतील सर्व शाळांमधील शिक्षकवर्ग तसेच केंद्रीय टीमचे सदस्य सहभागी झाले होते. शिक्षकांमध्ये सर्जनशीलता, मानसिक स्वास्थ्य आणि सातत्यपूर्ण शिक्षणाला चालना देणे हा या दिवसाचा मुख्य उद्देश होता.

कम्युनिटी डे हा विशेषतः मुंबईतील सर्व शाळांमधील शिक्षकांसाठी एकत्र येऊन शिकण्यासाठी आणि तणावमुक्त होण्यासाठी रचना करण्यात आला होता. या दिवशी विविध कार्यशाळा आणि उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते, ज्यामुळे व्यावसायिक विकासासोबतच वैयक्तिक अभिव्यक्तीलाही वाव मिळाला.

शिक्षकांना मंडाला आर्ट, फिल्म स्क्रीनिंग, इन्स्टाग्राम व्हिडिओ निर्मिती, लाकूड काम (वुडवर्क), नाट्यकला आणि आर्थिक साक्षरता अशा उपक्रमांपैकी कोणतेही तीन उपक्रम निवडण्याची मुभा देण्यात आली होती.

प्रत्येक सत्र हे विविध संस्थांमधील तज्ज्ञ आणि अनुभवी प्रशिक्षकांनी घेतले, ज्यामुळे दर्जेदार सहभाग आणि अर्थपूर्ण शिक्षण अनुभव मिळाला.

संपूर्ण दिवसभर वातावरण उत्साही आणि सहकार्याचे होते. शिक्षकांनी नवीन कौशल्ये आत्मसात केली, विविध शाळांमधील सहकाऱ्यांशी संवाद साधला आणि दैनंदिन कामकाजातून एक ताजेतवाने विश्रांती अनुभवली. मार्गदर्शकांनी वेगवेगळ्या दृष्टीकोनातून सत्रे सादर केली, ज्यामुळे प्रत्येक उपक्रम माहितीपूर्ण आणि आनंददायी ठरला.

एकूणच, कम्युनिटी डेने एकात्मता, सर्जनशीलता आणि सातत्यपूर्ण शिक्षणाचा उत्सव साजरा केला. या उपक्रमामुळे शिक्षक प्रेरित, उत्साही झाले आणि वर्गात वापरण्यासाठी नव्या कल्पनांसह परतले.

10. Parent Meeting on Menstruation

A Parent Meeting on Menstruation was conducted on 25th November in the school hall for the mothers of girls from Grades 5 to 8, with the objective of creating awareness, addressing myths, and strengthening parental support during menstruation, especially at the time of a girl's first menstruation. The session covered menstrual myths and facts, physical and emotional changes during menstruation, and the role of both mothers and fathers in supporting their daughters. Detailed guidance was provided on the correct use of sanitary pads, hygiene practices, and safe disposal methods. Mothers participated in an open group discussion, while a separate interaction was held with fathers to sensitise them on menstrual health, emotional support, and creating a supportive home environment. The meeting helped normalise conversations around menstruation, improved parental understanding, and encouraged informed and positive support for adolescent girls.

इयत्ता ५ वी ते ८ वी मधील मुलींच्या मातांसाठी २५ नोव्हेंबर रोजी शाळेच्या सभागृहात मासिक पाळी विषयावर पालक बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीचा उद्देश मासिक पाळीबाबत जनजागृती करणे, गैरसमज दूर करणे तसेच विशेषतः मुलीच्या पहिल्या मासिक पाळीच्या काळात पालकांचा आधार अधिक मजबूत करणे हा होता. सत्रामध्ये मासिक पाळीविषयी असलेले समज व वास्तव, या काळातील शारीरिक व भावनिक बदल तसेच मुलींना पाठबळ देण्यात आई-वडिलांची भूमिका यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. सॅनिटरी पॅडचा योग्य वापर, स्वच्छता पद्धती आणि पॅडची सुरक्षित विल्हेवाट याबाबत सविस्तर मार्गदर्शन देण्यात आले. मातांसोबत खुली गटचर्चा घेण्यात आली, तर वडिलांसाठी स्वतंत्र संवाद सत्र आयोजित करून मासिक आरोग्य, भावनिक आधार आणि घरात सकारात्मक व सहायक वातावरण निर्माण करण्याबाबत संवेदनशीलता वाढविण्यात आली. या बैठकीमुळे मासिक पाळीबाबत मोकळा संवाद प्रस्थापित झाला, पालकांची समज वाढली आणि किशोरवयीन मुलींना माहितीपूर्ण व सकारात्मक आधार देण्यास चालना मिळाली.

## 11. Podar Volunteer Student felicitation

The programme aimed to recognise and appreciate the contribution of Podar School student volunteers (SEWA), strengthen collaboration between NMMC School No. 93 and Podar International School, and encourage more students to join the volunteer initiative.

During September, around 50 Grade 10 student volunteers provided daily classroom support for 50–60 minutes. They assisted teachers in small-group teaching, remedial sessions, reading, phonics practice, basic mathematics, writing corrections, worksheets, and group activities under teacher supervision. Volunteers also supported classroom engagement, discipline, and smooth transitions, while offering individual attention to students who required additional academic support.

A certificate felicitation programme was conducted to appreciate the efforts of the student volunteers. Certificates of appreciation were awarded to approximately 50 volunteers, and the Academic Coordinator shared the impact of their contribution and expressed gratitude. Interactive sessions were also held to motivate students and encourage the inclusion of Grade 9 students in the volunteer programme.

The initiative resulted in improved learning support for students, better classroom engagement, and smoother activity management. It strengthened the partnership between Podar School and NMMC School No. 93, while helping volunteers develop confidence, responsibility, and leadership skills. There was also increased interest in expanding the programme to include Grade 9 students.



या उपक्रमाचा उद्देश पोदार स्कूलच्या विद्यार्थी स्वयंसेवकांच्या (SEWA) योगदानाचे कौतुक करणे, NMMC शाळा क्र. 93 आणि पोदार इंटरनॅशनल स्कूल यांच्यातील सहकार्य अधिक मजबूत करणे तसेच अधिक विद्यार्थ्यांना स्वयंसेवक उपक्रमात सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करणे हा होता.

सप्टेंबर महिन्यात सुमारे ५० इयत्ता १० वीच्या विद्यार्थी स्वयंसेवकांनी दररोज ५०–६० मिनिटे वर्गात सहाय्य केले. त्यांनी शिक्षकांना लहान गटांमध्ये अध्यापन, पुनराभ्यास सत्रे, वाचन, फॉनिक्स सराव, गणितातील मूलभूत संकल्पना, लेखन दुरुस्ती, वर्कशीट्स आणि गट उपक्रमांमध्ये मदत केली. अतिरिक्त शैक्षणिक सहाय्याची गरज असलेल्या विद्यार्थ्यांना वैयक्तिक लक्ष देण्यात आले. तसेच वर्गातील सहभाग वाढवणे, शिस्त राखणे आणि उपक्रमांदरम्यान सुरळीत बदल घडवून आणण्यासाठी स्वयंसेवकांनी शिक्षकांना सहकार्य केले.

विद्यार्थी स्वयंसेवकांच्या योगदानाची दखल घेण्यासाठी प्रमाणपत्र वितरण कार्यक्रम आयोजित करण्यात आला. सुमारे ५० स्वयंसेवकांना कौतुकाची प्रमाणपत्रे देण्यात आली. शैक्षणिक समन्वयकांनी स्वयंसेवकांच्या कार्याचा


THE AKANKSHA FOUNDATION MUMBAI-33

प्रभाव स्पष्ट करत त्यांचे आभार मानले. विद्यार्थ्यांशी संवाद साधून त्यांना प्रेरणा देण्यात आली तसेच इयत्ता ९ वीच्या विद्यार्थ्यांना या उपक्रमात सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करण्यात आले.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या शिकण्यात लक्षणीय सुधारणा झाली, वर्गातील सहभाग वाढला आणि उपक्रम व्यवस्थापन अधिक सुलभ झाले. पोदार स्कूल व NMMC शाळा क्र. 93 यांच्यातील भागीदारी अधिक बळकट झाली. तसेच स्वयंसेवक विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, जबाबदारीची भावना आणि नेतृत्वगुण विकसित झाले, आणि भविष्यात इयत्ता ९ वीच्या विद्यार्थ्यांना समाविष्ट करण्याबाबत सकारात्मक उत्सुकता निर्माण झाली.

12) **Social Workers' and Counselors' Professional Development Session**

On 29th November 2025, a session on Social Cohesion was conducted by Rohit for social workers and school counselors. The session was designed to build a deeper understanding of social cohesion at an individual level and to strengthen participants' ability to foster inclusive and empathetic environments within the school community.

The session was highly interactive and activity-based, allowing participants to actively engage rather than passively listen. Rohit Bhaiya introduced key concepts such as stereotypes, prejudice, bias, and discrimination, and explained how these attitudes influence individuals' emotions, behaviour, self-esteem, and interpersonal relationships. Real-life examples were used to help participants connect theory with everyday experiences in schools and communities.

Through reflective activities and group discussions, participants shared personal experiences, discussed situations that had impacted them deeply, and expressed emotions related to inclusion, exclusion, and belonging. These activities encouraged self-awareness, emotional expression, and empathy, helping participants understand how unconscious biases can affect their professional interactions with students, parents, and colleagues.

The session also highlighted the role of social workers and school counselors in promoting social harmony, respect for diversity, and emotional safety within schools. Participants reflected on strategies to create inclusive classrooms, respond sensitively to discrimination, and support students facing social or emotional challenges.

Overall, the session provided valuable insights and practical tools for strengthening empathy, reflective practice, and inclusive thinking. It reinforced the importance of social cohesion in building positive school cultures and equipped participants with perspectives that can be applied in counseling sessions, classroom interactions, and community engagement.

२९ नोव्हेंबर २०२५ रोजी सामाजिक कार्यकर्ते व शाळा समुपदेशकांसाठी रोहित भैय्या यांच्या मार्गदर्शनाखाली सामाजिक एकोपा (Social Cohesion) या विषयावर सत्र आयोजित करण्यात आले. या सत्राचा उद्देश वैयक्तिक पातळीवर सामाजिक एकोपा समजून घेणे आणि शाळा व समुदायामध्ये समावेशक व संवेदनशील वातावरण निर्माण करण्यासाठी आवश्यक दृष्टीकोन विकसित करणे हा होता.

हे सत्र पूर्णपणे क्रियाकलापांवर आधारित होते, ज्यामुळे सहभागी सक्रियपणे सहभागी झाले. सत्रादरम्यान पूर्वग्रह, ठोकताळे (stereotypes), पक्षपात आणि भेदभाव या संकल्पनांची ओळख करून देण्यात आली व त्या

व्यक्तींच्या भावना, वर्तन, आत्मसन्मान आणि नातेसंबंधांवर कसा परिणाम करतात हे स्पष्ट करण्यात आले. शाळा व समाजातील प्रत्यक्ष उदाहरणांद्वारे या संकल्पना अधिक प्रभावीपणे समजावून सांगण्यात आल्या.

विविध कृती व गटचर्चांमधून सहभागी सदस्यांनी स्वतःच्या आयुष्यातील अनुभव, काही प्रसंगांतील भावना तसेच विसरता न येणाऱ्या घटना शेअर केल्या. या उपक्रमांमुळे आत्मपरीक्षण, भावनिक जाणीव आणि सहानुभूती विकसित होण्यास मदत झाली. नकळत निर्माण होणारे पूर्वग्रह आपल्या व्यावसायिक कामावर कसा परिणाम करू शकतात याची जाणीव सहभागी सदस्यांना झाली.

या सत्रामध्ये सामाजिक कार्यकर्ते आणि शाळा समुपदेशकांची भूमिका—शाळेत समता, विविधतेचा सन्मान, आणि भावनिक सुरक्षितता निर्माण करण्यात कशी महत्त्वाची आहे—यावर विशेष भर देण्यात आला.
समावेशक वर्गसंस्कृती निर्माण करणे, भेदभावाच्या घटनांवर संवेदनशीलतेने प्रतिसाद देणे आणि सामाजिक व भावनिक अडचणींचा सामना करणाऱ्या विद्यार्थ्यांना आधार देणे याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

एकूणच, हे सत्र अत्यंत अर्थपूर्ण ठरले. सहभागी सदस्यांना सहानुभूती, आत्मपरीक्षण आणि समावेशक विचारसरणी विकसित करण्यासाठी उपयुक्त दृष्टिकोन व व्यवहार्य साधने मिळाली. सामाजिक एकोपा मजबूत करून सकारात्मक शालेय संस्कृती घडवण्यासाठी हे सत्र उपयुक्त ठरले असून, समुपदेशन, वर्गातील संवाद आणि समुदाय सहभागामध्ये या शिकवणींचा वापर करता येईल.